२१/५


महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१४४१९ ई मेल: neela.ranade@nic.in


क्र. जीपीडीपी-२०२२/प्र.क्र. २३५ /पंरा- ६ दिनांक :-२९ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद. ( सर्व)

विषय : सन २०२३-२४ या वर्षाचा संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबत..

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. जीपीडीपी २०२१/प्र.क्र.२९/पंरा-६, दि. १७/०८/२०२१.
२. राज्य शासनाचे पत्र क्र. जीपीडीपी-२०२२/प्र.क्र.१४८/पंरा-६, दि.१०/१०/२२.
३. अपर सचिव, पंचायतीराज विभाग, भारत सरकार यांचेकडील दि. ११/११/२२ रोजीच्या VC व्दारे घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

राज्यातील सर्व ग्रामपंचायती "आमचं गाव आमचा विकास" या उपक्रमांतर्गत दरवर्षी ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करीत आहेत. राज्य शासनाने ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करणेच्या प्रक्रियेबाबत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. सध्या पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायती प्रमाणे पंचायत समिती व जिल्हा परिषदांनी विकास आराखडे तयार करणेबाबत राज्य शासनाने शासन निर्णय क्र. जीपीडीपी-२०२१/प्र.क्र. २१/पंरा- ६, दि. ०१/११/२०२१ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान या योजनेमध्ये काही सुधारणा करून "पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान" अशी योजना जाहीर केलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी ०१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च,२०२६ या कालावधीमध्ये करावयाची आहे. केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर सन २०२२-२३ पासून शाश्वत विकास ध्येयांची प्रथम प्रधान्याने अंमलबजावणी करण्याचे निश्चित केलेले आहे. त्यासाठी आवश्यक ते क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे कार्यक्रम "पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान" अंतर्गत घेण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व ग्रामपंचायतींचे विकास आराखडे शाश्वत विकास ध्येये सन २०३० पर्यंत साध्य करण्याच्या दृष्टीने तयार करणेबाबत केंद्र शासनाने सूचित केलेले आहे.

भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने शाश्वत विकासाच्या १७ ध्येयांचा समावेश असलेल्या ९ संकल्पना जाहीर केलेल्या आहेत. या ९ संकल्पनांचे स्थानिकीकरण करून त्या आधारे ग्रामपंचायत विकास

आराखडे तयार करावयाचे आहेत. ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्याबाबत यापूर्वी वेळोवेळी मार्गदर्शक सूचना राज्य शासनाने निर्गमित केलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/बदल करण्यात येत आहेत. या सुधारीत मार्गदर्शक सूचनानुसार राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सन २०२३-२४ या वर्षाचे संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करावयाचे आहेत.

सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभेमध्ये विचारविनिमय करून सन २०२३-२४ या वर्षी प्रथम प्राधान्याने साध्य करावयाच्या संकल्पनांची निवड करावी. पंधराव्या वित्त आयोगाच्या ६० टक्के बंधित निधीतून -जलसमृध्द गाव व स्वच्छ व हरित गाव॰ या संकल्पनांवरील तरतुदी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे ही बाब विचरात घेऊन ग्रामपंचायतींनी प्राधान्याने १ ते ३ संकल्पनांची निवड करून त्या संकल्पनांतर्गत निश्चित केलेली ध्येये/उध्दिष्टे साध्य करणेबाबत संकल्प करून ग्रामसभेचा ठराव पारित करावा.

१. या निवड केलेल्या संकल्पांची नोंद Vibrant Gram sabha पोर्टल वर करावी. सदरची नोंद केल्याशिवाय GPDP/eGramSwaraj पोर्टलवर आराखडयाविषयीची माहिती अदयावत करता येणार नाही.

२. महिला सभा, वॉर्ड सभा, बाल सभा व वंचित घटकांची सभा .

प्रत्येक ग्रामपंचायतीने ग्रामसभेपूर्वी महिला सभा, वॉर्ड सभा, बाल सभा व वंचित घटकांच्या सभा घ्यावयाच्या आहेत. या सभांमधून गावातील सर्व ग्रामस्थांना ग्रामपंचायत विकास आराखडयाशी सर्व संबंधित माहिती दयावयाची आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींची माहिती दयावी.

अ. ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती , गाव गरिबी निर्मुलन आराखडा, मिशन अंत्योदय सर्व्हेक्षणातील माहिती, ग्रामसभेपूर्वी घेण्यात आलेल्या वॉर्ड सभा, महिला सभा, बाल सभा व वंचित घटकांची सभा मधील ठराव/प्रस्ताव, राज्य शासन व जि.प. च्या विविध विभागांमार्फत ग्रामपंचायती साठी मंजूर वा प्रस्तावित करण्यात आलेले उपक्रम/कामे/योजना/कार्यक्रम, ग्रामपंचायतीस आराखडा तयार करण्यासाठी विविध स्त्रोतांमधून उपलब्ध होणारा निधी इ.

ब. ग्रामसभेमध्ये संकल्प करून निवड केलेल्या शाश्वत विकासाची संकल्पना व या संकल्पनेंतर्गत समाविष्ट असलेले विविध उपक्रम यांची माहिती.

क. सदरची सर्व विभागांकडील आवश्यक ती माहिती संबंधित ग्रामपंचायतीस या सभा घेणेपूर्वी उपलब्ध करून देण्याची व संबंधित ग्रामपंचायतीस वेळेत उपलब्ध झाल्याची खात्री करण्याची जबाबदारी त्या-त्या ग्रामपंचयतीच्या गणासाठी नियुक्त केलेल्या विस्तार अधिकारी / पर्यवेक्षिका यांचेवर लेखी आदेशान्वये सोपवावी.

३. ग्रामसभा: (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडे अंतीम करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने कमीतकमी दोन ग्रामसभा घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

अ) पहिली ग्रामसभा :

१. पहिल्या ग्रामसभेमध्ये संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती, गाव गरिबी निर्मुलन आराखडा, मिशन अंत्योदय सर्व्हेक्षणातील माहिती, ग्रामसभेपूर्वी घेण्यात आलेल्या वॉर्ड सभा, महिला सभा, बाल सभा व वंचित घटकांची सभा मधील ठराव/प्रस्ताव, राज्य शासन व जि.प. च्या विविध विभागांमार्फत ग्रामपंचायती साठी मंजूर वा प्रस्तावीत करण्यात आलेले उपक्रम/कामे/ योजना/कार्यक्रम , ग्रामपंचायतीस आराखडा तयार करण्यासाठी विविध स्त्रोतांमधून उपलब्ध होणारा निधी इ. माहिती ग्रामसभेमध्ये सादर करावी. त्याचप्रमाणे ग्रामसभेमध्ये निवड केलेल्या शाश्वत विकासाची संकल्पना व या संकल्पनेंतर्गत समाविष्ट असलेले विविध उपक्रम, महिला, वॉर्ड, बाल व वंचित घटकांच्या सभेमार्फत करण्यात आलेले ठराव व

शिफारसी इ. बाबी ग्रामसभेमध्ये सादर करून उपक्रम निहाय प्राधान्यक्रम ठरवून आराखडा तयार करावयाचा आहे.

२. ग्रामसभेमध्ये सर्व विभागाच्या ग्रामस्तरीय कर्मचा-यांनी उपस्थित रहण्याचे बंधनकारक करण्यात आलेले असून, त्यानुसार या कर्मचा-यांनी ग्रामसभेमध्ये त्यांच्या विभागाची आवश्यकती माहिती सादर करावयाची आहे.

३. ज्या राज्य / जि.प. विभागाचे ग्रामस्तरावर कर्मचारी उपलब्ध नाहीत, अशा विभागांनी त्यांचेकडील ग्रामपंचायतनिहाय माहिती संबधित गट विकास अधिका-यांना उपलब्ध करून देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबधित खातेप्रमुखांना लेखी सूचना देऊन त्यानुसार कार्यवाही होत असल्याची खबरदारी घ्यावी.

४. ग्रामपंचायतीने ई-ग्रामस्वराज पोर्टल मध्ये निवडलेल्या संकल्पनांची माहिती भरुन , पोर्टल मध्ये त्या संकल्पनेंतर्गत नमूद केलेल्या (ड्रॉप डाऊन) उपक्रमांमधून प्रस्तावीत उपक्रमांची यादी करून, उपक्रमांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यातील कमीत कमी ५० % उपक्रम व त्यासाठी प्रस्तावीत तरतुद नमूद करून प्रारूप आराखडा तयार करावा.

५. सदर प्रारूप आराखड्यातील प्रत्येक उपक्रम व तरतुदीबाबत सविस्तर चर्चा ग्रामसभेमध्ये करावी.

६. प्रारूप आराखड्यातील प्रत्येक उपक्रम व तरतुदीबाबत साधक-बाधक चर्चे अंती ग्रामपंचायतीचा प्रारुप ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची मान्यता घ्यावी.

७. ग्रामसभेने मंजूर केलेल्या या प्रारुप ग्रामपंचायत विकास आराखड्यातील प्रत्येक उपक्रमाचे प्रकल्प अहवाल ग्रामपंचायतीने तयार करून , प्रकल्प अहवालासह ग्रामपंचायतीचा प्रारुप ग्रामपंचायत विकास आराखडा तालुका स्तरीय छाननी समितीकडे छाननीसाठी सादर करावा.

८. तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीने प्राप्त झालेल्या प्रारुप ग्रामपंचायत विकास आराखड्याची छाननी तीन दिवसामध्ये करून प्रारुप आराखडा त्यांच्या सहमतीसह किंवा त्रुटी नमूद करुन, संबधित ग्रामपंचायतीकडे पाठवावा.

ब) दुसरी ग्रामसभा :

१. तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीकडून प्रारूप आराखडयास सहमती प्राप्त झाल्यास तो प्रारुप आराखडा या दुस-या ग्रामसभेमध्ये अंतीम करून त्यास ग्रामसभेची मान्यता घ्यावी.

२. तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीकडून आराखड्यामध्ये त्रुटी दर्शविल्या असल्यास, त्या त्रुटींची पूर्तता करून, आराखड्यास ग्रामसभेची मान्यता घेऊन आराखडा अंतीम करावा.

३. तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीने सहमती दर्शविलेल्या किंवा त्रुटी पूर्तता करून ग्रामसभेने अंतिम मान्यता दिलेला ग्रामपंचायत विकास आराखडा ई ग्रामस्वराज पोर्टलवर अपलोड करावा.

५. पेंसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींनी संकल्पनांधारित (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना वर नमूद बाबी बरोबरच शासन निर्णय क्र. जीपीडीपी २०२१/प्र.क्र.२९/पंरा-६, दि. १७/०८/२०२१ व त्यापूर्वीच्या शासन निर्णया मधील पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

६. ई-ग्राम स्वराज पोर्टल वर आराखडा अपलोड करताना, आराखड्यासाठी उपलब्ध होणारा निधी बंधित व अबंधित निधी मध्ये भरावयाचा आहे.

अ) बंधित निधी - यामध्ये पंधराव्या वित्त आयोगाचा ६० % ( ३० % पाणीपुरवठा व ३० % स्वच्छता ) बंधित निधी, स्वनिधीतील १५ % मागासवर्गियांसाठी, १० % महिला व बालकल्याण, ५ % दिव्यांग कल्याण, प्रशासनासाठी ३५ % निधी आणि राज्य व जि.प. च्या इतर खात्याकडून ग्रामपंचायती साठी मंजूर असलेल्या

योजना/उपक्रम/कार्यक्रमासाठी (जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, इ.) मंजुर निधी तसेच स्थानिक विकास कार्यक्रमातुन ( खासदार,आमदार निधी ) यांचा समावेश राहील.

ब) अबंधित निधी - यामध्ये पंधराव्या वित्त आयोगाचा ४० % अबंधित निधी, स्वनिधीतील वर नमूद बंधित निधी वगळतां उर्वरित सर्व निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विकास कामांसाठी आराखड्यानुसार प्राप्त होणारा निधी, बक्षिसे व पारितोषिके यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मिळणारा निधी, आदिवासी विभागाकडून पेसा गावांना मिळणारा ५ % अबंध निधी, लोकवर्गणी व लोकसहभागातुन उपलब्ध होणारा निधी.

७. निधीचे स्त्रोत आणि वर्गीकरण: संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेसाठी खालील प्रमाणे निधीचे स्त्रोत आणि वर्गीकरण विचारात घ्यावयाचे आहे.

**ग्रामपंचायत विकास आराखडा - उत्पन्नाचे स्त्रोत**

| अ.नं. | उत्पन्नाचे स्त्रोत | उपक्रम | अपेक्षित निधी | आराखडा तयार करण्यासाठी उपलब्ध होणारा निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंधरावा वित्त आयोग | अ) बंधित निधी | | | रु. ४० लाख निधीचे उदाहरण. (१.२०पट नियोजन) |
| | | १.पाणीपुरवठा (३०%) | १२.०० | १४.४० | |
| | | २.स्वच्छता (३०%) | १२.०० | १४.४० | |
| | | ब) अबंधित निधी (४०%) | १६.०० | १९.२० | |
| २ | स्व-उत्पन्न | अ) बंधित निधी | | | रु. १० लाख निधीचे उदाहरण. |
| | | १) मागासवर्गियासाठी उपक्रम (१५%) | १.५० | १.५० | |
| | | २) महिला व बालकल्याण (१०%) | १.०० | १.०० | |
| | | ३) दिव्यांग कल्याण (५%) | ०.५० | ०.५० | |
| | | ४) प्रशासकिय खर्च (३५%) | ३.५० | ३.५० | |
| | | ब) अबंधित निधी | ३.५० | ३.५० | |
| ३ | राज्य शासन व जि.प. च्या विभागाकडून योजनांसाठी उपलब्ध होणारा निधी (जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, इ.) | बंधित निधी - संबधित विभागाकडून ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात येणा-या योजना | | | |

| अ.नं. | उत्पन्नाचे स्त्रोत | उपक्रम | अपेक्षित निधी | आराखडा तयार करण्यासाठी उपलब्ध होणारा निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ४ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विकास कामांसाठी प्राप्त होणारा निधी. | अबंधित निधी - ग्रामपंचायतीने तयार केलेल्याआराखड्या नुसार उपक्रम | | | |
| ५ | बक्षिसे व पारितोषिके यांच्या माध्यमांतून ग्रामपंचायतींना मिळणारा निधी. | अबंधित निधी | | | |
| ६ | आदिवासी विभागाकडून मिळणारा ५% निधी | अबंधित निधी (शासनाच्या निकषांनुसार) | | | |
| ७ | लोकवर्गणी व लोकसहभाग | अबंधित निधी | | | |
| ८ | मा. खासदार व आमदार निधी | बंधित निधी - मंजुर उपक्रमासाठी | | | |
| | एकूण | | | | |

८. याबाबत आवश्यक ते क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे कार्यक्रम राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान व संचालक, राज्य ग्रामीण संस्था, यशदा, पुणे यांनी आयोजित करावेत

९. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करणेबाबत संपूर्ण जबाबदारी संबधित जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी याबाबत स्वत: पुढाकार घेऊन, सर्व संबधितांशी समन्वय साधून कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

आपली,

( नीला रानडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. विभागीय आयुक्त, सर्व
२. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे.
३. संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, पुणे.
४. निवड नस्ती (पं.रा.-६)